सायं दैनिक

# शक्ती झुंजार

अन्याय विरुद्ध वाचा फोडणारा निर्भीड व निपक्ष

संपादक :– संतोष राम काळे

वर्ष १ ले, अंक २३७ वा | पुणे, सोमवार १७ जून २०२४ | पृष्ठे–६, किंमत : रुपये ५.०० |

VOL NO- 1, ISSUE- 237 | PUNE, MONDAY, 17 Jun 2024 | PAGES- 6, PRICE : Rs. 5.00 |

Title - Code :-MAHMAR52803, - SDM/SR/67/2023

# गोवा राज्यातुन आणलेला मद्य साठा राज्य उत्पादन शुल्क, दौंड विभागाकडून जप्त

पुणे ग्रामीण,दि.१७ :– आंब्याच्या रिकाम्या लाकडी पेट्यांच्या आड लपवून गोव्यातुन अहमदनगर कडे विक्रीसाठी आनलेल्या मद्याच्या साठा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जप्त करण्यात आली. या कारवाईत १२ लाख ६१ हजार रुपये किंमतीच्या मद्यासह एकूण ३० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे यांच्या आदेशान्वये उपायुक्त सागर धोमकर, अधीक्षक चरणसिंग राजपूत, उपअधीक्षक उत्तम राव शिंदे, सुजित पाटील, संतोष जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दौंड विभागाने ही कारवाई केली. रविवारी (ता. १६) गोवा राज्यात निर्मित व विक्रीकरीता असलेल्या अहमदनगर जिल्ह्याकडे होत असलेल्या मद्याच्या वाहतुकीवर ही कारवाई केली.

गोवा राज्य निर्मित मद्याची अवैधरित्या मोठ्या प्रमाणावर आवक केली जाते. त्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दौंडच्या पथकाने मोहिम राबवली.दि. १६/०६/२०२४ रोजी गोपनीय माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दौंडच्या पथकाला मिळाली की गोव्यातुन अहमदनगरकडे गोवा राज्यात निर्मित मद्याच्या बाटल्या विक्रीसाठी आनलेल्या जात आहे व सावळा लाऊन वाहनांच्या तपासणी दरम्यान दौंड विभागातील मोरगाव–सुपे रस्त्यावर मुर्टी गावच्या हद्दीत हॉटेल सानिकाजवळ वाहन (क्र. एमएच १६ सीडी ५४१९) हे बोलेरो पिक–अप वाहन व वाहन (क्र. एमएच १२ एमएफ ६५७५) ही ह्युदाई कंपनीची क्रेटा गाडी थांबवून वाहन चालकांकडे चौकशी केली. दोन्ही वाहनचालकांची तपासणी केली असता, एका वाहनात आंब्याच्या रिकाम्या लाकडी पेट्यांच्या आड लपवून गोवा राज्यात निर्मित व विक्रीस असलेले विविध विदेशी मद्याच्या बाटल्या सापडल्या.



या प्रकरणी नामदेव हरिभाऊ खैरे, संदीप बबन सानप, गोरख भगवान पालवे, महेश गुलाबराव औताडे (सर्व रा. अहमदनगर) यांना अटक करण्यात आली.

सदर कारवाईत निरीक्षक विजय रोकडे, दुय्यम निरीक्षक प्रदीप झुंजरुक, शुभम भोईटे, केशव वामने, नवनाथ पडवळ, अशोक पाटील, चंद्रकांत इंगळे यांनी सहभाग घेतला. पुढील तपास दुय्यम निरिक्षक प्रदीप झुंजरुक करत आहेत.

